# ई - पोलीस पत्रिका

दि.१९/०४/२०२४ अनु.क्र.७१

## (अमरावती शहर पोलीसांची२०२४ ची उद्दिष्टे)

- नागरिकांशी मित्रत्वाचे संबध.
- उच्च मनोबलयुक्त व तणाव मुक्त पोलीस दल.
- महिला, मुले व ज्येष्ठ नागरिकांची सुरक्षा.
- जातीय सलोखा वाढविणे.
- संघटित गुन्हेगारी आणि आतंकवादी यांचे विरूद्ध कठोर कारवाई.
- रस्त्यावरील गुन्हेगारीवर नियंत्रण/सुरक्षा.
- पोलीसकोठडीत गुन्हे घडू नदेणे.
- आरोपी पोलीसांचे ताब्यातून पळून जाऊ नयेत.
- "सुरक्षित व सुखकर अमरावती" हा आमचा संकल्प आम्ही व्यापक लोकसहभागातून साध्य करू.

## भाग-१

## पदोन्नती/बदली/प्रशिक्षण/रजा

### बदली

**०१.पोआअ/पशा-३/बदलीवर कार्यमुक्त/२८०७/२०२४, अमरावती दिनांक १४/०३/२०२४**

### आदेश

मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद नांदेड यांचे आदेश क्रमांक: जिपना/शिअ-प्रा/प्रा-१अ/२३४६/२०२४ दि.१३/०३/२०२४ अन्वये श्री. सचिन त्र्यंबकराव राजुरकर, कनिष्ठ श्रेणी लिपीक सद्या नेमणुक पोलीस आयुक्त कार्यालय,अमरावती शहर यांची जिल्हा परिषद ,नांदेड अंतंगत जिल्हा परिषद केंद्रीय शाळा, खंबाळा, तालुका किनवट, जिल्हा नांदेड येथेप्राथमिक शिक्षण सेवक (पदवीधर शिक्षक-इ. ६वी ते ८वी गणित व विज्ञान) या पदावर नियुक्ती झालेली आहे.

श्री.सचिन त्र्यंबकराव राजुरकर, कनिष्ठ श्रेणी लिपीक यांनी महाराष्ट्र राज्य परिक्षा परिषद, पुणे जाहिरात क्र. मरापप/बापवि/२०२३/५४०दि.३१/०३/२०२३ अन्वये आयोजित महाराष्ट्र शिक्षण बुध्दीमापन व अभियोग्यता चाचणी २०२२ ( TAIT) या परिक्षेअर्तगत शिक्षक पदावरील नियुक्तीकरीता विहीत कार्यपध्दतीचा अवलंब करुन आवेदन अर्ज सादर केला होता.

**महाराष्ट्र शासन, शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्र: एसआर व्ही-१०९२/१०३३/प्र.क्र/३३/९२/८ दि.०२/०२/१९९७** मधील नियम क्रमांक २ (ब) मधील (१) तरतुदीनुसार विहीत कार्यपद्धतीचा अवलंब करुन अर्ज केला असल्याने त्यांना नविन पदावर नियुक्तीकरीता निवड झाल्यावर पूर्वीच्या पदाचा राजीनामा देण्याची आवश्यकता असणार नाही अशा कर्मचाऱ्यांना नविन पदाचा कार्यभार घेण्यासाठी कार्यमुक्त करण्यात यावे असे नमुद आहे.

त्याअन्वये श्री.सचिन त्र्यंबकराव राजुरकर, कनिष्ठ श्रेणी लिपीक यांना पुर्वीचा (कनिष्ठ श्रेणी लिपीक) पदाचा राजिनामा देण्याची आवश्यकता नसल्याने त्यांना जिल्हा परिषद,नांदेड अंतंगत जिल्हा परिषद केंद्रीय शाळा, खंबाळा, ता. किनवट जि. नांदेड येथेप्राथमिक शिक्षण सेवक (पदवीधर शिक्षक-इ. ६वी ते ८वी गणित व विज्ञान) या नविन पदावर रुजु होण्यासाठी या कार्यालयाचे आस्थापनेवरुन दि.१४/०३/२०२४ रोजी म.नंतर कार्यमुक्त करण्यात येत आहे.

**०२.पोआअ/पशा-३/संगर्वबाह बदली/हजर/सवुले/३२८७/२०२४, अमरावती दिनांक २७/०३/२०२४**

### आदेश

मा. पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेकडील आदेश क्रमांक: पोमसं/ D८A०१७/१५/२०२३-DESK८A दि.०७/०३/२०२४ अन्वये खालील नमुद कनिष्ठ श्रेणी लिपीक यांची त्यांचे विनंतीनुसार व स्वखर्चाने संवर्गबाह्य बदली पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई ते अमरावती परिक्षेत्र अशी करण्यात आली आहे. खालील नमुद कनिष्ठ श्रेणी लिपीक हे मा. विशेष पोलीस महानिरीक्षक, अमरावती परिक्षेत्र, अमरावती यांचे कार्यालयात दिनांक १९/०३/२०२४ रोजी म.पुर्व हजर झाले आहे.

मा.विशेष पोलीस महानिरीक्षक, अमरावती परिक्षेत्र, अमरावती यांचे आदेश क्र.अप/कक्ष-४/कश्रेलि.सं.बदली/२०२४/४९८दि.२०/०३/२०२४ अन्वये खालील नमुद कनिष्ठ श्रेणी लिपीक यांची या कार्यालयात नेमणुक करण्यात आली आहे.

| अ.क्र. | लिपीकांचे नाव व पद | पुर्वीचे नेमणुकीचे कार्यालय | बदलीवरील नविन नेमणुकीचे कार्यालय |
|---|---|---|---|
| ०१ | श्री. सुमित बाबाराव वसुले, कनिष्ठ श्रेणी लिपीक | पोलीसआयुक्त, बृहन्मुंबई | पोलीस आयुक्त, अमरावती शहर |

त्यानुषंगाने श्री. सुमित बाबाराव वसुले, कनिष्ठ श्रेणी लिपीक हे पोलीस आयुक्त अमरावती शहर या आस्थापनेवर दि.२१/०३/२०२४ रोजी म.पुर्व हजर होण्याकरीता आले असुन त्यांना या कार्यालयाचे आस्थापनेवरील कनिष्ठ श्रेणी लिपीक चे रिक्त पदी **दि. २१/०३/२०२४ चे म.पुर्व** रुजुकरण्यात येत आहे. तसेच त्यांची लेखा शाखेत **पोलीस कल्याण निधी लिपीक** या कार्यासनावर तात्पुरत्या स्वरुपात नेमणुक करण्यांत येत आहे.

## भाग-२

## शिक्षा/निलंबन/पुन्हा स्थापना/बक्षिस/सेवानिवृत्त/मयत/नाव कमीकरणे

### शिक्षा

**०१.पोआअ/विचौ-१/अं.आ./पोहवा-९२२/४०३२/२०२४अमरावती शहर दिनांक १९/०४/२०२४**

### आदेश

**संदर्भ :-**क्रं.पोआअ/विचौ-१/का.दा.नो./पोहवा-९२२ सरोदे/२२६२/२०२४ दिनांक २९/०२/२०२४

**कसुरदाराचे नाव** :- पोहवा/९२२ अजय उदेभान सरोदे, नेमणूक मोटर परिवहन विभाग, पो.मु.अमरावती शहर

**थोडक्यात कसुर :-**

तुम्ही कसुरदार पोहवा/९२२ अजय उदेभान सरोदे, नेमणूक - मोटर परिवहन विभाग, पो.मु. अमरावती शहर येथे नेमणूकीस असून पिडीत महिला अंशुजा अशोक इंदुरकर यांचे सोबत शारीरिक संबंध करण्यासाठी मिरींडामध्ये नशेचा पदार्थ देवून सिटी लॉज, बस स्टॅण्ट रोड येथे आणले व पिडीत महिला हीचे नग्न अवस्थेतील फोटो व शुटींग सार्वजनिक करण्याची धमकी देवून वारंवार अमरावती येथील अंबा लॉज, देवगीरी लॉज, वलगाव, परतवाडा आणि चिखलदरा येथील लॉजवर शासकिय गणवेशात (पोलीस गणवेशात) नेवून तीचे इच्छेविरुध्द दारु पाजून शारीरिक संबंध प्रस्तापित करुन नैतिक अध:पतन केले त्याअनुषंगाने अंशुजा अशोक इंदुरकर, रा.राहुल नगर, विटाभटटी परिसर मेश्राम किराणा जवळ, अमरावती हिचे तक्रारीवरुन तुमचे विरुध्द पो.स्टे. सिटी कोतवाली, अमरावती शहर येथे अप क्रं.२०३/२०२३ कलम ३७६ (२) (न) ३५४ (ड) (क), ५०६ भादवि सहकलम ६६ (ई) चा गुन्हा दाखल झाला आहे.

तुम्ही पोलीस खात्यात अत्यंत जबाबदार अशा पदावर काम करीत असून तुमचे वर्तन पोलीस खात्याचे दृष्टीने अत्यंत बेजबाबदार व बेशिस्तपणाचे व अशोभनिय आहे.तसेच तुमच्या अशा कृत्यामुळे पोलीस खात्याची प्रतिमा मलीन झाली आहे.तुमच्या कर्तव्याप्रती तुम्हाला कोणतेही गांभीर्य नाही. तुम्ही

शिस्तबध्द पोलीस खात्याला न शोभणारे कृत्य करुन नैतिक अध:पतन केले आहे. तुमच्या बेजबाबदार व बेशिस्तपणाचे व अशोभनिय वर्तणाबाबत तुम्हाला मुंबई पोलीस (शिक्षा व अपील) १९५६ नियम क्रमांक ३ (२) (५) चे तरतुदी नुसार**पुढील देय वार्षीक वेतन वाढ ३ (तीन) वर्षाकरीता(अपरिणामकारक)का रोखण्यात येवु नये?**म्हणुन कारणे दाखवा नोटीस देण्यांत आली.सदर नोटीस तुम्ही दिनांक ०४/०३/२०२४ रोजी स्विकारुन त्यावर आपले स्पष्टीकरण सादर केले.तत्पुर्वी तुम्हास दिनांक १०/०४/२०२४ रोजी मा. पोलीस आयुक्त यांचे आज्ञांकित कक्षेत समक्ष बोलविण्यात येवून तुमचे म्हणणे ऐकूण घेण्यात आले असता ते समाधानकारक दिसून आले नाही परंतु तुम्हांस पुढील कर्तव्यात सुधारण्याची एक संधी देण्यात येत असुन कारणे दाखवा नोटीस मध्ये देण्यात आलेल्या प्रस्तावित शिक्षेमध्ये अंशत: बदल करुन खालील प्रमाणे अंतिम आदेश निर्गमीत करण्यांत येत आहे.

**अंतिम आदेश**

उपरोक्त कसुरी प्रकरणी पोहवा/९२२ अजय सरोदे, नेमणूक मोटर परिवहन विभाग, पोलीस मुख्यालय, अमरावती शहर यांना मुंबई पोलीस (शिक्षा व अपील) १९५६ नियम क्रमांक ३ (२) (५) चे तरतुदी नुसार **पुढीलदेय वार्षीक वेतन वाढ १ (एक) वर्षाकरीता (अपरिणामकारक) शिक्षेबाबतचे** अंतीम आदेश निर्गमीत करण्यांत येत आहे. तसेच महाराष्ट्र नागरी सेवा (पदग्रहण अवधी, स्वीयोत्तर सेवा आणि निलंबन, बडतर्फी व सेवेतुन काढुन टाकणे यांच्या काळातील प्रदाने) नियम १९८१ मधील ७२ (१) (बी) नुसार दिनांक ०९/०५/२०२३ पासून ते दिनांक ०७/०७/२०२३ पावेतो निलंबन कालावधी हा**"जसाचे तसा"(As Such)**करण्यात येत आहे.

उपरोक्त शिक्षेने कसुरदार व्यथित होत असल्यास सदर आदेश प्राप्त झाल्याचे तारखेपासुन ६० दिवसाच्या आत मा.अपर मुख्य सचिव, गृहविभाग, मंत्रालय, मुंबई यांना यथायोग्य मार्फतीने अपिल अर्ज सादर करु शकता.

## भाग-३

## वेतन/संरचना/वेतन निश्चितीती/वार्षीक वेतनवाढ/संकीर्ण

## संकीर्ण

**१.पोआअश/लेखा शाखा-पोकनि/वैद्यकीय अग्रीम मंजुरी/३३१४/२०२४, अमरावती शहर दिनांक २७/०३/२०२४**

## आदेश

पोलीस आयुक्त अमरावती शहर, या घटकाचे आस्थापनेवरील पोशि / १६२७ रविंद्र मरसकोल्हे नेमणुक पोलीस मुख्यालय यांचा अपघात झाला असल्यामुळे वैद्यकीय कारणास्तव अग्रीम मिळणे बाबत केलेल्या विनंती नुसार वैद्यकीय प्रमाणपत्रावरुन **महाराष्ट्र पोलीस कल्याण निधी नियमावली- २०२२ मधील नियम ९ (२) (ब) तरीतुदी नुसाररुपये ५०,०००/- (अक्षरी पन्नास हजार फक्त)** अग्रीम विस समान हप्त्यात माहे एप्रिल -२०२४ चेवेतनातून रु ५०००/-प्रमाणे परत करण्याच्या अटीवर मंजुर करण्यात येत आहे.

| अ.क्र. | अधिकारीकर्मचारी यांचे नाव व पदनाम | कर्ज मागण्याचे कारण | मंजुर कर्ज | वसुल करावयाची प्रती महा रक्कम व हप्त्यांची संख्या | वसुली सुरु करावयाचा महीणा |
|---|---|---|---|---|---|
| ०१ | पोशि/१६२७ रविंद्र मरसकोल्हे नेमणुक पोलीस मुख्यालय अमरावती शहर | स्वत:च्या आजारावर औषधोपचारा करीता | ५०,०००/- | **रुपये ५०००/- प्रमाणे १० हप्त्यामध्ये** | एप्रिल-२०२४ |

**२.पोआअश/लेखा शाखा-पोकनि/वैद्यकीय अग्रीम मंजुरी/३३४१/२०२४, अमरावती शहर दिनांक २८/०३/२०२४**

## आदेश

पोलीस आयुक्त अमरावती शहर आस्थापनेवरील खालील नमूद पोलीस अंमलदार व कर्मचारी यांना त्यांचे मागणी अर्जानुसार वैद्यकीय अग्रीम **महाराष्ट्र पोलीस कल्याण निधी नियमावली- २०२२ मधील नियम ९ (२) (ब) तरीतुदी नुसार**खालील प्रमाणे मंजुर करण्यात येत आहे.

| अ.क्र. | अधिकारीकर्मचारी यांचे नाव व पदनाम | कर्ज मागण्याचे कारण | मंजुर कर्ज | वसुल करावयाची प्रती महा रक्कम व हप्त्यांची संख्या | वसुली सुरु करावयाचा महीणा |
|---|---|---|---|---|---|
| १ | पो.हवा./४५० विजय मधुकर लांडे नेमणुक पोलीस मुख्यालय अमरावती शहर | पत्नीच्या आजाराचे औषधोपचारा करीता | ५०,०००/- | **रुपये ५०००/- प्रमाणे १० हप्त्यामध्ये** | एप्रिल-२०२४ |
| २ | श्री. प्रितम नगिनदास डिके, सफाई कामगार नेमणुक पोलीस मुख्यालय अमरावती शहर | स्वत:च्या आजारावर औषधोपचारा करीता | १५,०००/- | **रुपये १५००/- प्रमाणे १० हप्त्यामध्ये** | एप्रिल-२०२४ |

**३.पोआअश/लेखा शाखा/घबाअ-७६१०/३०२४/२०२४, अमरावती शहर दिनांक २०/०३/२०२४**

**विषय :-** मागणी क्र.बी-११ मुख्य लेखा शिर्ष ७६१० शासकिय कर्मचाऱ्यांना कर्ज, गौणशिर्ष २०१ घरबांधणी अग्रीम (सांकेतांक क्रमांक-७६१०००८७) मंजूर करणेबाबत

## आदेश

महाराष्ट्र शासन गृह विभाग मुंबई यांचे आदेशक्र शा.नि क्र.गृह विभाग, क्र.बीयुडी-०४२३/प्र.क्र.१२२/आस्था-१ दि.०२.०५.२०२३ तसेच पोलीस महासंचालक,महाराष्ट्र राज्य मुंबई यांचे आदेश क्र.पोमसं/३१/३९-१/घबाअ/२०२२-२३/२०१/२०२२ दि.०३.११.२०२३ अन्वये शासकिय अधिकारी/कर्मचारी यांना घरबांधणी अग्रीम मागणीक्र बी-११ मुख्य लेखाशिर्ष ७६१० शासकिय कर्मचारी इत्यादीना कर्ज मधील गौणशिर्ष २०१ (७६१०-००८७) अन्वये या कार्यालयास घरबांधणी अग्रीम निधी रू.२०,००,०००/- (रु.वीस लाख फक्त) या कार्यालयास उपलब्ध करून देण्यात आला असून सदर निधी आस्थापनेवर कार्यरत

खालीलप्रमाणे नमूद मंत्रालयीन लिपीक यांना **रू.२०,००,०००/- (रू.वीस लाख फक्त)** घरबांधणी अग्रीम म्हणून खालील अटी व शर्तीच्या अधिन राहुन मंजुर करण्यात येत आहे.

| अ.क्र. | कर्मचाऱ्याचे नाव व पदनाम | अग्रीमाचा प्रकार | मंजूर रक्कम | कपात करावयाचे मुददल हफते |
|---|---|---|---|---|
| १. | कश्रेलि/माधवी महादेव तडसे, नेमणूक पोलीस आयुक्त कार्यालय अमरावती शहर | तयार घर घेणेकरीता घरबांधणी अग्रीम | रु. २०,००,०००/- | १७५००X ११४<br>५००० X ०१ |
| | | **एकूण** | **२०,००,०००/-** | |

**(अक्षरी- रू.वीस लाख फक्त)**

**<u>अटी व शर्ती</u>**

१. शासन निर्णय वित्त विभाग क्र.घबाअ-२०१२/प्र.क्र.३०/२०१२/विनीयम दि.२०.०२.२०१५ तसेच शासन निर्णय वित्त विभाग क्र.घबाअ-२०१९/प्र.क्र.१४/२०१९/विनीयम दि.०२.०२.२०२१ मधील नियम क्र.०७ (१२) तरतुदीनुसार अग्रीमाच्या नियमित परतफेडी करीता **अग्रीमधारक स्वत:जबाबदार राहतील.**

२.अग्रीम प्राप्त झाल्यानंतर ०१ महिन्याचे आत सदर अग्रीम ज्या कारणाकरीता मंजूर करण्यात आला आहे त्यांचे विनीयोजनाची कागदपत्रे **(गहाणखत, शासकिय संचलनालय यांचेकडील विमा, बोजासह ७/१२ नमुना, वारसदार यांचे संमतीपत्र, उपयोगिता प्रमाणपत्र इ.)** सादर करणे बंधन कारक राहील

३. अग्रीम मंजूर झाल्यानंतर उपरोक्त नमूद विहीत कालावधीत घरबांधणी अग्रीम विनीयोजनाची कागदपत्रे सादर न केल्यास शासन निर्णय वित्त विभाग दि.२६.०९.१९९७ अन्वये **<u>२.७५% अतिरीक्त दराने दंडनीय व्याजासह</u>** सदर अग्रीमाची एकरकमी वसुली करण्यात येइल.

४. नियम क्र.०३ चे कार्यवाही नंतरही अग्रीम धारक यांनी आवश्यक कागदपत्रे या कार्यालयास सादर न केल्यास शासन निर्णय दि.२६.०९.१९९७ मधील तरतुदीनुसार अग्रीमधारक यांचे विरूद्ध शिस्तभंग विषयक कार्यवाही प्रस्तावीत करण्यात येइल.

५. खोटे करारनामा, गहाणखत इ. सादर करून शासनाची दिशाभूल झाल्याचे निदर्शनास आल्यास शासन निर्णय वित्त विभाग दि.२६.०९.१९९७ अन्वये आवश्यकता वाटल्यास **फौजदारी गुन्हा दाखल करण्यात येइल.**

६.मुददलाची नियमित कपात झाल्यानंतर नियोजित व्याजाची कपात वेतनात करून घेणेबाबत सर्वस्वी जबाबदारी संबधीत अर्जदार यांची राहील.

७. मुद्दल कपातीनंतर व्याजाची परिगणना शासनाने प्रसिद्ध केलेल्या वित्तीय वर्ष २०२२-२३ चे व्याजदरानुसार करण्यात येइल.

८.अग्रीमधारक अनधिकृत रजेवर राहिल्यास अथवा इतर अन्य कोणत्याही कारणास्तव त्याच्या कर्तव्यापासून दूर राहिला तरीही घरबांधणी अग्रीमाची नियमित परतफेड करण्यास संबंधित अग्रीमधारक स्वत: जबाबदार राहील.

सदरचा खर्च भागविण्यासाठी आवश्यक त्या निधीची तरतुद सन २०२३-२०२४ मधील मुळ मंजुर अनुदानातुनकरण्यात यावा तसेचसदरचा खर्च **मुख्य लेखाशिर्ष ७६१०-शासकिय कर्मचारी** इत्यादीना **कर्जगौणशिर्ष २०१घरबांधणी अग्रीम** मागणी **क्र.ब-११ सांकेतांक क्र.७६१०००८७** मधुन वित्तीय वर्ष **सन २०२३-२०२४** च्या मुळ मंजूर अनुदानातुन भागविण्यात यावा.

**४.पोआअश/लेखा शाखा/संगणक अग्रीम २३-२४/३०२३/२०२४, अमरावती शहर दिनांक २०/०३/२०२४**

**आदेश**

महाराष्ट्र शासन गृह विभाग मुंबई यांचे आदेशक्र शा.नि क्र.गृह विभाग, क्र.बीयुडी-०६२२/प्र.क्र.१११/आस्था-१ दि.०३.०३.२०२३ तसेच पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य मुंबई यांचे आदेश क्र.पोमसं/३१/३९-४/मोवाअ-संगणक अग्रीम (२०२२-२३)/२०२/२०२२ दि.२४.०३.२०२३ अन्वये शासकिय अधिकारी/कर्मचारी यांना संगणक अग्रीम मागणी क्र बी-११ मुख्य लेखाशिर्ष ७६१० शासकिय कर्मचारी इत्यादीना कर्ज मधील गौणशिर्ष **२०४ (७६१०-१८५१)संगणक अग्रीम** निधी अन्वये **रू.२०,०००/- (वीस हजार फक्त)** इतका निधी उपलब्ध करून दिलेला आहे. करीता या आस्थापनेवर कार्यरत खालीलप्रमाणे नमूद एकूण ०१ पोलीस अमलदार यांना प्रत्येकी रू.२००००/- (रू.वीस हजार फक्त ) प्रत्येकी याप्रमाणे एकूण रू.२०,०००/- (वीस हजार फक्त) फक्त **संगणक अग्रीम** खालील अटी व शर्तीच्या अधिन राहुन मंजुर करण्यात येत आहे.

| अ.क्र. | कर्मचाऱ्याचे नाव व पदनाम,बं नं | अर्ज करतेवेळी नेमणूक पो.स्टे/शाखा | मंजूर रक्कम | कपात करावयाचे मुददलहफते |
|---|---|---|---|---|
| १. | मपोशि/४९८ अनिता सुभाषराव बेलसरे | वलगाव | २०,००० | १०००X२० |
| | | **एकूण** | **२०,०००/-** | |

**(अक्षरी- रू.वीस हजार फक्त)**

**अटी व शर्ती**

१)महाराष्ट्र शासन वित्त विभाग,मंत्रालय मुंबई यांचे शासन निर्णय क्र.अग्रीम-१०११/प्र क्र.५०/२०११ विनीयम मंत्रालय, मंबई दि.०२ फेब्रुवारी २०१२ मधील नमूद अटीचे अनंषंगाने सदर अग्रीम मंजूर करण्यात येत आहे.

२) सदर अग्रीम वरीलप्रमाणे नमूद नियोजीत हफत्यानूसार करण्यात येईल, **वेतनातुन अग्रीम नियोजित व नियमित परतफेडी करीता अर्जदार स्वत:जबाबदार राहील,याची नोंद घ्यावी.**

३) अग्रीम प्राप्त झाल्यानंतर ३० दिवसाचे आत संगणक/लॅपटॉप/ इ.खरेदी केल्याबाबत खरेदीच्या पावतीची प्रत व इतर कागदपत्रे कार्यालयास सादर करणे बंधनकारक राहील तसेच सदर पावतीवर व्हॅट/टिन क्रमांक असणे बंधनकारक राहील.

४) अग्रीम प्राप्त झाल्यानंतर मुंबई वित्तीय नियम १९५९ चे नमूना क्र.२० प्रमाणे गहाणखत करून देणे बंधनकारक राहील.

५) गहाणखतावर खरेदी केलेल्या संगणक/लॅपटॉपची सर्व माहिती कंपनीचे नाव/मॉडेल क्रमांक इ.नमूद करणे आवश्यक राहील.

६) अग्रीमाची रक्कम प्राप्त झाल्यानंतर आपण करून दिलेल्या संमती पत्राच्या आधारे एक महिन्याच्या आत संगणक संच खरेदी करून त्यांचे अधिकृत दस्ताऐवज गहाण खतासह कार्यालयास सादर न केल्यास अग्रीमाचा गैरवापर केल्याचे गृहीत धरून १७.७५ टक्के दराने व्याज आकारणी करून वसुली तसेच शिस्तभंगाची कार्यवाही करण्यात येईल.

८) संगणकाचा विमा शासकिय विमा निधीकडे उतरवून त्याबाबत विमा कंपनीची पावती सादर करणे आवश्यक राहील.

९) संगणक खरेदीसाठी भविष्य निर्वाह निधीमधुन नापरतावा रकमेची मागणी करता येणार नाही.

१०) वरील अटी व शर्तीचे परिपुर्ण पालन करून अग्रीम धारक कर्मचाऱ्यांना बंधनकारक राहील.

११) अग्रीमाचा विनियोग दिलेल्या कारणासाठी न झाल्याचे आढळून आल्यास किवा वरीलप्रमाणे अटीचे पालन न केल्यास मुंबई वित्तिय नियम-१९५९ मधील नियम १२४ बी व वित्त विभाग,शा.निर्णय क्र.अग्रीम/१०९५/प्र.क्र.७०/९५/विनियम दि.२६.०९.१९९७ तसेच शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार दंडनीय व्याजाची वसुली करण्यात येईल.

सदरचा खर्च भागविण्यासाठी आवश्यक त्या निधीची तरतुद सन २०२१-२०२२ मधील मुळ मंजुर अनुदानातुन करण्यात यावा तसेच सदरचा खर्च **मुख्य लेखाशिर्ष ७६१०-शासकिय कर्मचारी** इत्यादीना **कर्ज गौणशिर्ष २०४** संगणक अग्रीम मागणी **क्र.ब-११ सांकेतांक क्र.७६१०१८५१** मधुन वित्तीय वर्ष **सन २०२२-२०२३** च्या मुळ मंजूर तरतुदीनुसार भागविण्यात यावा.

**(गणेश शिंदे)**
पोलीस उपायुक्त (मुख्या.)
अमरावती शहर

प्रति,

पत्रव्यहार शाखा/सेवापट नोंदणी लिपीक/सीसीटीएनएस